शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून एकाच व्यवस्थापनामार्फत सुरु असलेल्या संस्था विलिन करण्यास शासन मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. टीईएम-२०२०/प्र.क्र.९४/तांशि-४

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ११ ऑगस्ट, २०२०.

वाचा :- १) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची पत्रे क्रमांक २/ एनजीसी / २०२०/मान्यता/५०० ते ५०१, दि. १४/०७/२०२० व ५१६ ते ५२६, दि.२०/०७/२०२०.

प्रस्तावना :

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी प्रकाशित केलेल्या APH (Approval Process Handbook) २०२०-२१ मधील २.१० नुसार एकाच व्यवस्थापनामार्फत सुरु असलेल्या संस्था विलिन (merging) करण्याची तरतूद आहे. त्यानुसार सोबत जोडलेल्या प्रपत्र “अ” मधील अभियांत्रिकी पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी आणि व्यवस्थापनशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांना फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे संचालक, तंत्र शिक्षण यांनी वर नमूद क्रमांक १ येथील दिनांक १४/७/२०२० व २०/०७/२०२० च्या एकूण १३ स्वतंत्र पत्रांव्दारे या संस्थांच्या विलिनीकरणास शासन मान्यता देण्याची विनंती केली आहे.

शासन निर्णय :

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी मान्यता दिल्यानुसार सोबतच्या प्रपत्र “अ” मध्ये नमूद केल्याप्रमाणे संस्था विलिनीकरणास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.
२. प्रस्तुत विलिनाकरणानंतरची प्रवेश क्षमता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता मंजूर केल्याप्रमाणे राहील.
३. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेक्षक्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

४. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

५. संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६. सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

७. शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

८. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

९. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आ तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

१०. रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

११. याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबं़धित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००८१११४४०४८३७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=fcf7172a73579b34fa622983d8fb647780fbef1d35a1ca975955eb9193f3f800, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2020.08.13 12:11:34 +05'30'

(संजय औ. धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, ३०५, शासकीय तंत्रकिनेतन इमारत,४९, खेरवाडी,अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१

३. सहसंचालक, सर्व तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).

४. कुलसचिव, सर्व संबंधित विद्यापीठे (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)

५. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड

६. प्राचार्य, सर्व संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)

७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.

८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.

९. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, कम्बाईन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-ए-गालिब मार्ग, नवी दिल्ली -११०००२

१०. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.

११. निवड नस्ती/तांशि-४.

प्रपत्र "अ"

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.टीईएम-२०२०/प्र.क्र.९४/तांशि-४, दि. ११ ऑगस्ट, २०२०

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता संस्था विलिनिकरण करण्यासाठी अभातंशिप नवी दिल्ली यांचे मान्यतेस अनुसरून शासनास प्रस्तावित प्रस्तावांची यादी

अ. क्र	विलीन झालेल्या संस्थांची नावे व डीटीई कोड	विलिनीकरणा नंतर संस्थेचे नाव व डीटीई कोड़	**विलिनीकरणानंतर चालविण्यात येणारे अभ्यासक्रम**	अभिप्राय
१	५१८९ - पुज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी शहादा, जि. नंदुरबार ५२९८ - पुज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी शहादा, जि. नंदुरबार	५१८९ - पुज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी शहादा, जि. नंदुरबार [पीसीआय-१५२०]	**पदवी** १.बी.फार्मसी २.एम.फार्मसी (फार्मसी - क्वालीटी अँशुरन्स) ३. एम.फार्मसी (फार्मास्युटीक्स) **पदविका** ४. डी. फार्मसी	पत्र क्र.५००, दि.१४/७/२०
२	६३०४ - लोकनेते मा.हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे आदर्श इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च सेंटर, विटा, जि.सांगली (पालक संस्था) ६४४८ - लोकनेते मा.हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे आदर्श इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, विटा, जि.सांगली	६३०४ - लोकनेते मा.हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे आदर्श इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च सेंटर, विटा, जि.सांगली	**पदवी** १.इलेक्टॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग २.कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग ३. सिव्हिल इंजिनिअरींग ४. मेकॅनिकल इंजिनिअरींग **पदविका** ५. मेकॅनिकल इंजिनिअरींग ६. सिव्हिल इंजिनिअरींग ७. इलेक्टॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग ८. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग ९. कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी	पत्र क्र.५२२, दि.२०/७/२०
३	५३९० - के.व्ही.एन.नाईक एस.पी.संस्थेचे लोकनेते गोपीनाथजी मुंडे इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, नाशिक (पालक संस्था)	५३९० - के.व्ही.एन.नाईक एस.पी.संस्थेचे लोकनेते गोपीनाथजी मुंडे इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, नाशिक	**पदवी** १.इलेक्टॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग २.कॉम्प्युटर इंजिनिअरींग ३. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग	पत्र क्र.५०१, दि.१४/७/२०

अ. क्र	विलीन झालेल्या संस्थांची नावे व डीटीई कोड	विलिनीकरणा नंतर संस्थेचे नाव व डीटीई कोड़	**विलिनीकरणानंतर चालविण्यात येणारे अभ्यासक्रम**	अभिप्राय
	५३६७ - के.व्ही.एन.नाईक एस.पी.संस्थेचे पॉलिटेक्निक, नाशिक		४. सिव्हिल इंजिनिअरींग ५. मेकॅनिकल इंजिनिअरींग ६. आर्टीफीशिअल इंटीलिजन्स ॲन्ड मशिन लर्निंग **<u>पदविका</u>** ७. सिव्हिल इंजिनिअरींग ८. कॉटर इंजिनिअरींग ९. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग १०. मेकॅनिकल इंजिनिअरींग	
४	११२३- इंदिरा बहुउद्येश्शिय शिक्षण संस्थेचे डॉ.राजेंद्र गोडे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, अमरावती (पालक संस्था) १२४६ - इंदिरा बहुउद्येश्शिय शिक्षण संस्थेचे डॉ.राजेंद्र गोडे पॉलिटेक्निक, अमरावती	११२३- इंदिरा बहुउद्येश्शिय शिक्षण संस्थेचे डॉ.राजेंद्र गोडे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, अमरावती	**<u>पदवी</u>** १.कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग २.इलेक्टॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग ३. सिव्हिल इंजिनिअरींग ४. मेकॅनिकल इंजिनिअरींग **<u>पदव्युत्तर पदवी</u>** ५. ट्रान्सपोर्टेशन इंजि. ॲन्ड मॅनेजमेंट ६. थर्मल इंजिनिअरींग ७. कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग ८. इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशान्स इंजिनिअरींग **<u>पदविका</u>** ९. मेकॅनिकल इंजिनिअरींग १०.सिव्हिल इंजिनिअरींग ११. इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग	पत्र क्र.५२१, दि.२०/७/२०

अ. क्र	विलीन झालेल्या संस्थांची नावे व डीटीई कोड	विलिनीकरणा नंतर संस्थेचे नाव व डीटीई कोड़	**विलिनीकरणानंतर चालविण्यात येणारे अभ्यासक्रम**	अभिप्राय
५	५४०७ - जिजामाता एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ फार्मसी (डिग्री), नंदूरबार (पालक संस्था) ५२६९ - जिजामाता एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ फार्मसी, नंदूरबार	५४०७ - जिजामाता एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ फार्मसी, नंदूरबार	**पदवी** १.बी.फार्मसी **पदविका** २. डी. फार्मसी	पत्र क्र.५१८, दि.२०/७/२०
६	५३३०- पुणे विद्यार्थी गृहाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, नाशिक (पालक संस्था) ५११० - पुणे विद्यार्थी गृहाचे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, नाशिक	५३३० - पुणे विद्यार्थी गृहाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड श्रीकृष्णा एस. धामणकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, नाशिक	**पदवी** १. मेकॅनिकल इंजिनिअरींग २. कॉम्प्युटर इंजिनिअरींग ३. इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. ४. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी **पदव्युत्तर पदवी** ५. एमबीए (जनरल मॅनेजमेंट)	पत्र क्र.५१९, दि.२०/७/२०
७	११०७- पी.आर.पोटे (पाटील) एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर ट्रस्टचे ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन्स, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावती (पालक संस्था) ११४८- पी.आर.पोटे पाटील इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड रिसर्च, अमरावती	११०७ - पी.आर.पोटे (पाटील) एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर ट्रस्टचे, ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावती	**पदवी** १. कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग २. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग ३. इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. ४. मेकॅनिकल इंजिनिअरींग ५. सिव्हिल इंजिनिअरींग ६. सिव्हिल इंजिनिअरींग ७. कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग **पदव्युत्तर पदवी** ८. एमसीए ९. इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम्स १०. एमबीए ११. थर्मल इंजिनिअरींग १२. कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग	पत्र क्र.५२०, दि.२०/७/२०

अ. क्र	विलीन झालेल्या संस्थांची नावे व डीटीई कोड	विलिनीकरणा नंतर संस्थेचे नाव व डीटीई कोड़	**विलिनीकरणानंतर चालविण्यात येणारे अभ्यासक्रम**	अभिप्राय
			१३. इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन्स इंजि.	
८	६३१३ –शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे जयवंत कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, किल्ले मच्छिंद्रगड, ता.वाळवा, जि.सांगली (पालक संस्था) ६७१३ - शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री जयवंतराव भोसले पॉलिटेक्निक, किल्ले मच्छिंद्रगड, ता.वाळवा, जि.सांगली.	६३१३ - शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे जयवंत कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड पॉलिटेक्निक, किल्ले मच्छिंद्रगड, ता.वाळवा, जि.सांगली.	<u>पदवी</u> १. मेकॅनिकल इंजिनिअरींग २.इलेक्टॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग (टेक्नॉलॉजीनिशियन इलेक्ट्रॉनिक रेडिओ) ३. सिव्हिल इंजिनिअरींग ४.कॉम्प्युटर इंजिनिअरींग ५.इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग **<u>पदविका</u>** ६.सिव्हिल इंजिनिअरींग ७.कॉम्प्युटर इंजिनिअरींग ८.इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. ९.इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग १०.मेकॅनिकल इंजिनिअरी	पत्र क्र.५१७, दि.२०/७/ २०
९	५११७ -पायरेन्स इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन (IBMA), लोणी (बु.) जि.अहमदनगर पालक संस्था) ५४०० - पायरेन्स इन्स्टिटूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, अहमदनगर..	५११७ - पायरेन्स इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन (IBMA), लोणी (बु.), जि.अहमदनगर	१. एम.बी.ए. २. एम.सी.ए.	पत्र क्र.५२३, दि.२०/७/ २०
१०	६२७४- पुणे विद्यार्थी गृहाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, पुणे (पालक संस्था) ६७८८- पुणे विद्यार्थी गृहाचे लेट गोविंद काशिनाथ पाटे (वाणी) इन्स्टिटयूट ऑफ	६२७४ - पुणे विद्यार्थी गृहाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी ॲन्ड जी.के.पाटे (वाणी) इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट,	**<u>पदवी</u>** १. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग २. मेकॅनिकल इंजिनिअरींग ३. प्रिंटींग टेक्नॉलॉजी ४. इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन्स इंजि. ५. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी	. पत्र क्र.५१६, दि.२०/७/ २०

अ. क्र	विलीन झालेल्या संस्थांची नावे व डीटीई कोड	विलिनीकरणा नंतर संस्थेचे नाव व डीटीई कोड़	**विलिनीकरणानंतर चालविण्यात येणारे अभ्यासक्रम**	अभिप्राय
	मॅनेजमेंट, पुणे	पुणे.	६.कॉम्प्युटर इंजिनिअरींग **पदव्युत्तर पदवी** ७.इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम्स ८.प्रिंटींग टेक्नॉलॉजी ९.एमबीए	
११	२५४७ - मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळाचे लेट भागिरथी यशवंतराव पाथ्रीकर कॉलेज ऑफ डी. फार्मसी, ता.फुलांब्री, जि.औरंगाबाद २५८२ - मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळाचे लेट भागिरथी यशवंतराव पाथ्रीकर कॉलेज ऑफ फार्मसी, ता.फुलांब्री, जि.औरंगाबाद,	२५४७ - मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळाचे लेट भागिरथी यशवंतराव पाथ्रीकर कॉलेज ऑफ डी. फार्मसी, ता.फुलांब्री, जि.औरंगाबाद	**पदवी** १.बी.फार्मसी **पदविका** २. डी. फार्मसी	पत्र क्र.५२५, दि.२०/७/२०
१२	३२१७- विघ्नहर्ता ट्रस्टचे, शिवाजीराव एस. जोंधळे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, आसनगाव, जि.ठाणे (पालक संस्था) ३१४०- विघ्नहर्ता ट्रस्टचे, शिवाजीराव एस. जोंधळे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स ॲन्ड रिसर्च, आसनगाव, जि.ठाणे	३२१७ - विघ्नहर्ता ट्रस्टचे, शिवाजीराव एस. जोंधळे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, आसनगाव, जि.ठाणे	**पदवी** १. कॉम्प्युटर इंजिनिअरींग २. सिव्हिल इंजिनिअरींग ३. मेकॅनिकल इंजिनिअरींग ४. इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन्स इंजि. **पदव्युत्तर पदवी** ५.एनर्जी सिस्टिम्स ॲन्ड मॅनेजमेंट ६.कंन्स्ट्रक्शन इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट ७.एमएमएस	पत्र क्र.५२४, दि.२०/७/२०
१३	४१६७- नगर युवक शिक्षण संस्थेचे यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, नागपूर ४१७८- नगर युवक शिक्षण संस्थेचे राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड	४१६७- नगर युवक शिक्षण संस्थेचे यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, नागपूर	**पदवी** १. इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग २. इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. ३.कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी इंजिनिअरींग	पत्र क्र.५२६, दि.२०/७/२०

अ. क्र	विलीन झालेल्या संस्थांची नावे व डीटीई कोड	विलिनीकरणा नंतर संस्थेचे नाव व डीटीई कोड़	**विलिनीकरणानंतर चालविण्यात येणारे अभ्यासक्रम**	अभिप्राय
	रिसर्च, नागपूर ५२८४- S.M.B.T. 'S Sau. Mathurabai Bhausaheb Thorat Institute Of D. Pharmacy,		४. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ५. इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन्स इंजि. ६. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग ७.कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग ८.सिव्हिल इंजिनिअरींग ९.मेकॅनिकल इंजिनिअरींग १०.इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग **पदव्युत्तर पदवी** ११.स्ट्रक्चरल इंजिनिअरींग १२.कॉम्प्युटर एडेड डिझाईन ॲन्ड मॅन्युफॅक्चर १३.इंटिग्रेटेड पॉवर सिस्टिम्स १४.कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग १५.कम्युनिकेशन्स इंजिनिअरींग १६.एनव्हार्यमेंटल इंजिनिअरींग	

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरून, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी शासन मान्यता देण्याबाबत.

लेट भागिरथी यशवंतराव पाथ्रीकर कॉलेज ऑफ डी फार्मसी, पाथ्री, फुलंब्री

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.मान्यता-२०२५/प्र.क्र.५७८/तांशि-४
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ जुलै, २०२५.

संदर्भ : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एनजीसी/पीसीआय-मान्यता/२५४७ /५९५, दि.११.०७.२०२५.

प्रस्तावना : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, तंत्र शिक्षण यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व संचालक, तंत्र शिक्षण यांच्या प्रस्तावानुसार, **लेट भागिरथी यशवंतराव पाथ्रीकर कॉलेज ऑफ डी फार्मसी**, **पाथ्री**, **फुलंब्री** या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत सोबतच्या **"प्रपत्रामध्ये"** दर्शविल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

१) सदर मान्यता ही कायम विनाअनुदान तत्वावर राहील.
२) प्रस्तुत बाबतीत फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.
३) शासनाने विहित केलेल्या, तसेच, फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस, संचालक, तंत्र शिक्षण

यांच्यासोबत करारनामा करावा लागेल. तसेच, आवश्यक कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास, त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास शिक्षक, शिक्षकेतर व इतर तांत्रिक कर्मचारी, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या निकषाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. वेतन व भत्ते इ. बाबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून तसेच, संस्थेविरुध्द विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच, फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१०) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.२२.०२.२०१८ अन्वये विहित केलेले नोंदणी शुल्क संबंधित महाविद्यालय / संस्थेने भरणा केले नसेल, तर ते संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांनी संबंधित महाविद्यालय / संस्थेकडून भरणा करुन घ्यावे.

११) महाविद्यालयाने / संस्थेने सदर अभ्यासक्रमाकरीता, संबंधित विद्यापिठाचे संलग्नीकरण प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

३. या शासन मान्यतेनुसार उक्त संस्था / महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०७१४१७००१५४८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

THORAT AJITKUMAR ARUNRAO

Digitally signed by THORAT AJITKUMAR ARUNRAO
DN: CN = THORAT AJITKUMAR ARUNRAO, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.07.14 17:01:59 +05'30'

(अजितकुमार थोरात)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४) कुलसचिव, संबंधित विद्यापीठ (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५) संबंधित महाविद्यालय / संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६) निवडनस्ती (तांशि-४)

प्रपत्र

Higher and Technical Education Dept. G.R.No.Manyata-2025/C.R.578/TE-4, Dated : 14th July, 2025

List of Increase in Intake , New Course in existing Unaided Pharmacy Institute, Approved by PCI for A.Y. 2025-26

Sr.No.	DTE CODE	PCI CODE	INSTITUTE NAME	STATUS	PROGRAMME	UNIVERSITY NAME	LEVEL OF COURSE	MAIN COURSE NAME	COURSE NAME	Course Status	INTAKE APPROVED . for 2024-25	INTAKE APPROVED for 2025-26	VARIATION	REMARKS
1	2547	PCI-1190	Late Bhagirathi Yashwantrao Pathrikar College of D Pharmacy, Pathri, Tq.Phulambri, Dist.Aurangabad - 431111	Un-Aided	PHARMACY	Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere	POST GRADUATE	M. Pharmacy	Pharmaceutics	Unaided	0	15	15	New Course
					PHARMACY	Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere	POST GRADUATE	M. Pharmacy	Pharmacognosy	Unaided	0	15	15	New Course
					PHARMACY	Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere	POST GRADUATE	M. Pharmacy	Pharmaceutical Chemistry	Unaided	0	15	15	New Course
					PHARMACY	Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere	POST GRADUATE	M. Pharmacy	Pharmacology	Unaided	0	15	15	New Course

THORAT AJITKUMAR ARUNRAO

Digitally signed by THORAT AJITKUMAR ARUNRAO
DN: CN = THORAT AJITKUMAR ARUNRAO, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.07.14 17:02:08 +05'30'